सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

ठराव क्रमांक :-२६

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१६/०७/२०२० रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०२ ते २३ सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्तातील ठराव क्र.२३ मध्ये सन २०१९-२० साठी मा.शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान रु.७५ लक्ष हे अनुदान विशेष रस्ता अनुदान नसून, ते सर्वसाधारण रस्ता अनुदान अंतर्गत प्राप्त झालेले असलेने, मा.शासनचे दि.१६/०१/२०१६ तील मुद्दा क्र.२ ड नुसार काम निश्चित करणेचे अधिकार सर्वसाधारण सभेस असलेने सदर कामाचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेची आवश्यकत नसलेने, प्रस्तावित तिन्ही कामासाठी रितसर जाहिर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करुन, सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- सौ. अप्सरा मेहेंद्र वायदंडे.

अनुमोदक :- कु. सोनाली विलास सागरे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता

महासभा विभाग

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

ठराव क्रमांक :- ४०

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दिनांक ०४/०९/२०२० रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील अतिथीगृह इमारत, सांगली या महापालिकेच्या मालकीच्या इमारतीची स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्टच्या अनुषंगाने सदर इमारत धोकादायक झाली असलेने ती पाडणेबाबत मान्यता देणेकामीच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सिवस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका अतिथीगृह इमारत,सांगली या महापालिकेच्या मालकीच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्टच्या अनुषंगाने श्री.मुकूल परिख, परिख ॲण्ड असोसिएटस् आर्किटेक्ट, सांगली यांची नियुक्ती केलेनुसार व मा.आयुक्तसो आणि नियुक्त केले आर्किटेक्ट यांचेशी झाले चर्चेनुसार सदरचे काम श्री.यशोधन कन्स्ट्रोलॅब,कोल्हापूर यांचेकडून करुन घेणेत आले. त्यास अनुसरुन श्री.मुकूल परिख, परिख ॲण्ड असोसिएटस् आर्किटेक्ट, सांगली यांनी दिले अहवालानुसार सदर इमारतीच्या मजबुतीकरणासाठी लागणारा वेळ, खर्च तसेच भविष्यातील त्याचे वयोमानही जास्त राहणार नाही. तसेच, सदरची इमारत मुख्य बाजारपेठेत गजबजलेल्या वस्तीमध्ये व धोकादायक झालेली असलेने ती तातडीने सुरक्षितरित्या कोणतीही हानी न होता पाडून टाकण्यास मान्यता देणेत येत आहे. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन, निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर अतिथीगृह इमारतीच्या पाठीमागील असलेली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह ही इमारत सुद्धा फार जुनी झालेली असलेने, सदर इमारतीतील प्रसुतीगृह तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागेत स्थलांतरीत करुन, ती ही इमारत निष्काशित करणेत यावी व अतिथी गृह व प्रसुतीगृहाच्या संपूर्ण जागेमध्ये व्यापारी संकुल तसेच, प्रसुतीगृहाची सोनोग्राफी रुम,लॅबरोटरी विभाग,आयसीयु विभाग, स्पेशल रुम,ऑपरेशन थिअटर, एक्स-रे विभाग इत्यादी सुविधासह अद्यावत इमारत बांधकाम करुन, त्यास महापालिकेचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह व शॉपिंग कॉम्प्लेक्स असे नामकरण करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, सदर संकुल बांधकामसाठी येणाऱ्या खर्चाचा व सद्याच्या महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता, सदरचे व्यापारी संकुल व प्रसुतीगृह इमारत बांधकामासाठी महापालिकेचा निधी खर्च होवू नये यासाठी सदर संकुलाच्या पहिल्या मजल्यावरील व्यापारी गाळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ मधील तरतुदीनुसार विक्री करणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने सदर गाळे विक्री करणेसाठी ई ऑक्शन (ई लिलाव) पद्धतीचा वापर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

ठराव क्रमांक :- ४१

विषय क्रमांक :- ०५

महासभा क्र. ०५ ठराव क्र.१९६ दिनांक ११/०३/२०२० रोजीच्या सभेने सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणेत आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.उच्च न्यायालय,मुंबई रिटपिटीशन क्र.३४१२/२०१५ अन्वये बेघरांना तात्काळ घरकुले उपलब्ध करुन द्यावेत असे निर्देश दिलेनुसार मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने दैनिक ललकार मध्ये जाहिर निवेदन प्रसिद्ध करणेत आले होते. त्यामध्ये प्रथम प्राधान्य आरक्षित क्षेत्रावर झोपड्या बांधून राहणारे व रस्त्याच्या दुतर्फा झोपड्या बांधून राहणाऱ्या व्यक्तींना होते तद्नंतर बेघरांना सदर योजनेचा लाभ देणेचे होते.

त्यानुसार सांगली जिल्हा निविारा संघ व इतर यांनी बेघरांना सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बेघरांना राहण्यासाठी वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेत लाभ मिळावा अशी मागणी केलेनुसार मा.कोर्ट यादीप्रमाणे एकूण १८५ अर्ज तसेच, गृहनिर्माण संस्था अंतर्गत १७२ लाभार्थ्यांचे अर्ज असे एकूण ३५७ अर्ज दाखल केलेले आहेत. शासन निकषाप्रमाणे कोर्ट यादी प्रमाणे एकूण ९८ लाभार्थी पात्र व ८७ लाभार्थी अपात्र आहेत. तसेच, गृहनिर्माण संस्थेच्या यादी प्रमाणे एकूण ४१ लाभार्थी पात्र व १३१ लाभार्थी अपात्र आहेत. एकूण ३५७ लाभार्थ्यांपैकी २८२ लाभार्थ्यांनी तलाठी यांचा उत्पन्नाचा अहवाल सादर केला आहे. उर्वरित ७५लाभार्थ्यांनी उत्पन्नाचा अहवाल सादर केलेला नाही. सादर केलेला उत्पन्नाचा अहवाल हा तलाठी यांचा असून, शासन निकषाप्रमाणे सदरचा अहवाल तहसिलदारसो यांचा असणे आवश्यक आहे अशा आशयाचा उत्पन्नाचा अहवाल सादर करणेबाबत सांगली जिल्हा निवारा संघ व इतर यांना कळविणेत आले आहे.

महानगरपालिकेकडे बेघरांना राहण्यासाठी वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत जुना [illegible]गाव रोड सांगली येथील २१६ सदनिका व लोकमान्य कॉलनी मिरज येथील १२४ आणि मिरज [illegible]ळ रोड येथे २१६ अशी एकूण ५५६ घरकुले सद्या शिल्लक आहेत.

सांगली जिल्हा निवारा संघ व इतर यांनी दाखल केलेल्या रिटपिटशन प्रमाणे व मे.न्यायालयाने [illegible] केलेल्या आदेशानुसार एकूण ३५७ अर्जापैकी पात्र १३९ लाभार्थ्यांना त्यांचे मागणीनुसार वाल्मिकी [illegible]स योजनेतील रिकाम्या घरकुलाचा लाभ देणेस प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ [illegible]यंत्रण समितीने केले शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

[illegible] :- [signature]
मा. बावडेकर युवराज सतीश.

[illegible] :- [signature] मा. आवटी संदिप सुरेश.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

[illegible] (टानादानीक)

[illegible] महानगरपालिका

त्याच बरोबर अतिथीगृह इमारतीमध्ये सद्या जे भाडेकरु आहेत त्यांचे पुनर्वसन संकुलाच्या पहिल्या [illegible]यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अन्वये चालू बाजारभावाने भाडेपट्टयाने [illegible]नगरपालिकेच्या शर्ती-अटीनुसार करणेत यावे. सदर भाडेकरु हे मालकी हक्कासाठीच्या ई ऑक्शन [illegible]सुद्धा भाग घेवू शकतील. तसेच सदर भाडेकरु यांना प्रशासनाने सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यत [illegible]सायासाठी पर्यायी जागा भाडेपट्टयाने उपलब्ध करुन देणेत यावी त्याकरीता ही सभा मा.आयुक्त यांना [illegible]कृत करीत आहे.

सदर व्यापारी संकुल व प्रसुतीगृह इमारत बांधकाम करणेसाठी अंदाजपत्रक व आराखडे तयार [illegible]णेसाठी महापालिका पॅनलवरील वास्तुविशारद मे.परिख ॲन्ड असोशिएटस् आर्किटेक्ट, सांगली यांची [illegible]क्ती करण्यास मान्यता देणेत येत असून, नियुक्त वास्तुविशारद यांचेकडून आराखडे,अंदाजपत्रक इ.प्राप्त [illegible]च सदर प्रसुतिगृह व शॉपिंग कॉम्प्लेक्स इमारतीच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता [illegible]यात येत आहे. या इमारतीपासून मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च यासाठी स्वतंत्र इस्क्रो अकौंन्ट उघडणात [illegible]. तसेच, सदरच्या इमारत पाडणेसाठी व नविन व्यापारी संकुल व प्रसुतीगृह बांधकाम करणेसाठी संपूर्ण [illegible]येचा नियतकालिक आढावा घेणेसाठी ही सभा खालील प्रमाणे आठ सदस्यीय सनियंत्रण समिती गठीत [illegible]त आहे.

१.	मा.आयुक्तसो	अध्यक्ष
२.	मा.सौ.गिता सुतार	विशेष निमंत्रीत
३.	मा.श्री.उत्तम साखळकर	सदस्य
४.	मा.श्री.मैनुद्दीन बागवान	सदस्य
५.	मा.सौ.सुनंदा राऊत	सदस्य
६.	मा.श्री.शेखर इनामदार	सदस्य
७.	मा.श्री.संतोष पाटील	सदस्य
८.	शहर अभियंता	सदस्य सचिव

तसेच, महापालिकेच्या मालकीच्या एस.एफ.सी. मॉल जवळील न.भू.क्र.३४१ या जागेमध्ये असलेली कर्मचारी निवासस्थाने धोकादायक झालेली असलेने व ही जागा पार्किंग प्रकल्प विकासासाठी आवश्यक असलेने, त्याबाबतच्या कायदेशिर व न्यायप्रविष्ठ बाबी तपासून, आवश्यकत्या पुर्तता करुन सदर धोकादायक कर्मचारी निवासस्थान निष्काशित करणेस ही सभा आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- कु. सोनाली विलास सागरे
Sagar

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- जसीमा गॅबीसो नाईक
N.G Naik

महापौर,

[illegible] महानगरपालिक

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

क्रमांक :- ४२

क्रमांक :- ०६

महासभा क्र. ०५ ठराव क्र.१९७ दिनांक ११/०३/२०२० रोजीच्या सभेने सदरचा प्रस्ताव प्रलंबित आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.३६ दि.१४/०६/२०१९ अन्वये महापालिका क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाच्या सुरु असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना, झोपडपट्टी पुर्नवसन व ठी घरे सन २०२२ या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी झोपडपट्टीचे पुर्नवसन तात्काळ होणेसाठी महापालिकेच्या सनियंत्रण समिती समोर उपरोक्त विषय अनुषंगाने प्राप्त झालेल्या सर्व सूचना मान्यतेस्तव सादर करणेत येवून, सदर समितीच्या शीने प्रस्तुतचा विषय फेरसादर करणेस आदेशित करणेत आले होते.

त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना सनियंत्रण समितीने शिफारस केलेनुसार एकात्मिक ण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजनेंतर्गत टप्पा क्र.०२ इंदिरानगर घरकुल दिंडीवेस, मालगाव रज संजय गांधी नगर, मिरज येथील वाढीव लाभार्थ्यांकडून र.रु.४००००/- व मयत वारस ांकडून र.रु.५०००/- वंचीत लाभार्थ्यांसाठी मा.शासन निर्णयाप्रमाणे मागासवर्गीय लाभार्थ्यांना २,५००/- व खुला प्रवर्ग लाभार्थ्यांना र.रु.१५,०००/- भरुन घेवून, ज्या लाभार्थ्यांची महापालिका स्वमालकीची घरे आहेत व ज्यांची वाढीव यादीमध्ये व हमीपत्र यादीमध्ये दुबार नावे आलेली तसेच, जे लाभार्थी त्या ठिकाणी राहणेस नाहीत व त्यांची कागदपत्रे आढळून येत नाहीत असे गळून इतर पात्र लाभार्थ्यांना लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.शांता रघुनाथ जाधव यांनी खालीलप्रमाणे दिलेली आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज, इदगाहनगर येथील खालील लाभार्थी यांची महापालिका स्वत:ची मालकीची घरे असल्यामुळे त्यांची नावे कमी करणेत यावीत.

१. हसन सय्यद शेख

तसेच, संजय गांधीनगर झोपडपट्टी मिरज येथील ६१ ची यादीमधील वाढीव यादीमध्ये व हमीपत्र ज्यांची दुबार नावे आलेली आहेत. त्या खालील लाभार्थ्यांची नावे कमी करणेत यावीत.

१.नंदु राजाराम सोनार २. सुरेखा विजय भंडारी

तसेच, संजय गांधीनगर झोपडपट्टी मिरज येथील DPR व्यतिरिक्त अन्य ६१ झोपडपट्टी धारकांचा यातील अ व ब पात्रता निकष पुर्तता अहवालामधील लाभार्थी यादी मधील खालील लाभार्थी या ठिकाणी राहण्यास नाहीत व त्यांची कागदपत्रेही आढळून येत नाहीत. त्यामुळे सदर ची नावे कमी करणेत यावीत.

१. रोटीवाले हसन रफिक २.रोटीवाले शाहीन मुस्सा

उपरोक्त प्रमाणे नमुद केले ०५ लाभार्थ्यांची नावे घरकुल वाटप यादीमधून कमी करणेस व त्या ठिकाणी संजयगांधीनगर,मिरज येथील वाढीव लाभार्थ्यांमधील मा.शासन निर्णयातील निकषानुसार पात्र असणारे खालील लाभार्थांना घरकुलाचा लाभ देणेस मान्यता देणेत यावी.

१. प्रकाश चंद्रकांत जाधव	७. तानुबाई शिवाजी कांबळे
२. शिवराज हणमंत सोनार	८. संजय आप्पासो पवार
३. सुरेश हिरा सोनार	९. सोनाबाई लक्ष्मण तायडे
४. साऊबाई कुबेर सोनार	१०. भिम सुरेश कांबळे
५. पुजा सुरेश कांबळे	११. सुरज लालासो जाधव
६. मंगल दिलीप भालशंकर	१२. दिपाली चंद्रकांत जाधव

तसेच, मिरज येथील काळीखण मिलतनगर येथील घोषीत झोपडपट्टीमध्ये पावसाळयात खणीचे पाणी येत असून, खणीचा काही भाग ढासळत असलेने त्या ठिकाणचे झोपडपट्टीधारकांना संजयगांधीनगर झोपडपट्टी मिरज येथील घरकुले देणेस मान्यता देणेत यावी.

उक्त उपसूचनेस अनुसरुन ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मधील हसन सय्यद शेख यांचे इदगाहनगर डी.पी.रोड बाधित असलेने, त्यांना लाभ देणेत यावा.,नंदू राजाराम सोनार यांचे नाव वाढीव यादीमधून वगळणेत यावे., सुरेखा विजय भंडारी यांना यापूर्वीच सदनिका निश्चित केलेली असल्याने, त्यांचे नाव वगळणेत यावे., रोटीवाले हसन रफीक व रोटीवाले शाहीन मुसा हे लाभार्थी मिरज मध्ये आढळून येत नसलेने, त्यांचेही नाव लाभार्थी यादीतून वगळणेत यावीत. तसेच, मा.शासनाच्या निकषाप्रमाणे अ व ब चे पुरावे तपासून उपरोक्त १२ लाभार्थ्यां पैकी तानुबाई शिवाजी कांबळे व सुरज लालासो जाधव या दोन अपात्र लाभार्थी वगळून इतर पात्र १० लाभार्थांना संजय गांधीनगर मिरज येथील घरकुलाचा लाभ देणेस तसेच, मिरज येथील काळीखण मिलतनगर येथील घोषीत झोपडपट्टीमध्ये पावसाळयात खणीचे पाणी येत असलेने व खणीचा काही भाग ढासळत असलेने त्या ठिकाणचे झोपडपट्टीधारकांना संजयगांधीनगर झोपडपट्टी मिरज येथील शिल्लक राहणाऱ्या घरकुलांचा लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१० मधील बालहनुमान घरकुल योजना वडर कॉलनी येथील वाढीव पात्र लाभार्थ्यांचे वारसांचे घरकुलाचे मालकी हक्कावर वारस नोंद करणेस लाभार्थ्यांकडून रक्कम रु.५०००/- भरुन घेवून मा.शासन निकषानुसार पुरावे तपासून वारसाची नोंद करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी खालील प्रमाणे उपसूचना दिलेली आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरा घरकुल मिरज दिंडीवेस [illegible]गाव वेस येथील वारस वाढीव पात्र लाभार्थी तसेच संजय गांधीनगर मिरज येथी वंचित व वाढीव पात्र [illegible]र्थींना घरकुलाचा लाभा देण्याकरीता महापालिकेचे एकात्मिक आवास योजनेंतर्गत एकात्मिक [illegible]स योजनेंतर्गत घरकुल मिळण्याकरीता अर्ज केलेले आहेत. तसेच, संबंधीत लाभार्थी यांनी [illegible]कुलासाठी लागणारे आवश्यकती सर्व कागदपत्रे नगर अभियंता, श.ना.दा.नि. या कक्षाकडे सादर [illegible]ली आहेत. त्यास अनुसरुन जयश्री विजय वाघमारे, मालती सचिन बनसोडे,सौ.वासंती दिपक [illegible]मारे, श्री.दादासाहेब हिंदूराव कांबळे,कस्तुरी आप्पासाहेब घटकांबळे, अनुराधा हणमंत कांबळे, [illegible]न बाबासाहेब निशाणदार, सुमन पायाण्णा कोळी, कमल सत्याप्पा कांबळे, सुभद्राबाई पांडूरंग [illegible], श्रीकांत हिराप्पा कांबळे, श्री.अमोल विकास सुर्यांगण सदर लाभार्थ्यांना एकात्मिक आवास [illegible]र्तगत घरकुलाचा लाभ देण्यास मान्यता देणेत यावी.

उक्त उपसूचनेस अनुसरुन ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उपसूचनेमधील १२ पैकी मा.शासन निकषानुसार पात्र ठरणारे चार लाभार्थी श्रीमती जयश्री विजय वाघमारे,सौ.वासंती दिपक वाघमारे, मैनुद्दीन बाबासाहेब निशाणदार व कमल सत्याप्पा कांबळे या लाभार्थ्यांना घरकुले शिल्लक राहिल्यास सदर घरकुलांचा लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उपसूचनेनुसार मिरज ८० फुट व ५० फुट रस्ता रुंदीकरण बाधीत झोपडपट्टी धारकांना संजय गांधी घरकुल येथे पुनर्वसन करणेत आलेले आहे. त्यामध्ये बेबी अब्दुलकरीम लवंगे यांचे घर बाधीत झाले असून, पुनर्वसन यादीत त्यांचे नाव नगरचुकीने व त्रुटीमुळे राहून गेलेले आहे. त्यामुळे बेबी अब्दुलकरीम लवंगे हे लाभार्थी डी.पी.रोड ने बाधीत होत असल्याने, त्यांना संजयगांधी घरकुल योजनेत घरकुलाचा लाभा देणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, प्रशासनाने उक्त उपसूचनेमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यापूर्वी घरकुलाच्या डी.पी.आर.ला अधीन राहून तसेच, मा.शासनाने ठरवून दिलेले सर्व पात्रता निकष तपासून, पात्रता निकषानुसार जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांनाच नियमानुसार शुल्क भरुन घेवून तसेच सर्व कायदेशिर बाबींची पडताळणी करुन, घरकुल वाटप करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, सदर घरकुलाचा लाभ चुकीच्या लाभार्थ्यांस अथवा चुकीच्या पद्धतीने झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. संदिप आवटी. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज बावडेकर. महापौर,

शहर अभियंता (ज्ञानादिनिक)

महापालिका सचिव

मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

ठराव क्रमांक :- ४३

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.१०/०९/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१८ मध्ये होवून, सार्वत्रिक निवडणूकीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (२) अन्वये सोळा सदस्यांची महासभा ठराव क्र.५१ दि.१०/०९/२०१८ अन्वये अधिनियमातील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार स्थायी समितीवरील सोळा सदस्यांची नियुक्ती होवून, स्थायी समिती अस्तित्वात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३) अन्वये महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारनंतर स्थायी समिती वरील निम्मे सदस्य निवृत्त होतील. अशी तरतुद आहे. त्यामुळे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे पहिली महासभा दि.१०/०९/२०१८ रोजी झाल्याने, विद्यमान स्थायी समिती मधील निम्मे सदस्य म्हणजे आठ सदस्य अधिनियमातील कलम २०(४) मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या त्यांच्या तारखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशा वेळी व अशा रितीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यंत असतील ते निवृत्त होतील. त्यानुसार स्थायी समिती मध्ये जास्त काळापर्यंत काम केलेले आठ सदस्य दि.०१/०९/२०२० रोजी निवृत्त झाल्याने, अधिनियमातील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार भारतीय जनता पार्टीचे ०५ सदस्य, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ०२ सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ०१ असे एकूण ०८ सदस्यांची नियुक्ती करणेकामी संबंधीत गटनेते यांनी बंद लखोट्याद्वारे लेखी दिले पत्रानुसार खालील सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१.	मा.वनखंडे अनिता मोहन	भारतीय जनता पार्टी
२.	मा.कोरे पांडुरंग मार्तंड	भारतीय जनता पार्टी
३.	मा.राऊत सुनंदा चंद्रकांत	भारतीय जनता पार्टी
४.	मा.मदने सविता दादासो	भारतीय जनता पार्टी
५.	मा.यमगर संजय नारायण	भारतीय जनता पार्टी
६.	मा.पाटील पद्मश्री प्रशांत	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
७.	मा.जामदार करण किशोर	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
८.	मा.सुर्यवंशी दिग्विजय प्रदिप	राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

वरील प्रमाणे नोंद घेवून योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. युवराज बावडेकर.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. प्रकाश ढंग.

महापौर,

सचिव
शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

ठराव क्रमांक :- ४४

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे सन्मा.सदस्या सौ.नसीम सलीम शेख यांनी दिलेली सूचना सर्वानुमते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) अन्वये दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मधील नागरिकांचेकडून विविध ठिकाणी कामगिरी होणेसाठी वारंवार मागणी केली आहे. त्यानुसार खालील एकूण तीन कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध होणेसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय र.रु.
१.	सांगली वॉर्ड क्र.१७ मधील सि.स.नं.१२२३२ मध्ये आखाडा व सभागृह बांधणे	७६,८९,०९०/-
२.	सांगली वॉर्ड क्र.१७ मधील सि.स.नं.१२८६७ मनपा ओपन स्पेसमध्ये सभागृह बांधणे	३९,०९,६९७/-
३.	सांगली वॉर्ड क्र.१७ मधील जवाहर चौक येथील मनपा ओपनस्पेसला कंपौंड वॉल बांधणे	१६,६०,०००/-
	एकूण	१,३२,५८,७८७/-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत तयार केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद असलेली र.रु.१,३२,५८,७८७/- मात्रचे तीन कामे सदर योजनेसाठी असलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.एन यु आर २०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३, दि.०८/११/२०१० मधील परिच्छेद क्र.२ अभियानांतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी दिलेल्या निर्देशानुसार लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित केली असून, सदर क्षेत्रातील कामास अर्थसहाय्य मिळणेकरीता सुधारणा कार्यक्रमाच्या दृष्टीने महानगरपालिकेने खालील प्रमाणे कार्यवाही ठेवलेली आहे. त्यानुसार उपरोक्त बाबींचा समावेश करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ. क्र.	सुधार कार्यक्रम	सद्यस्थिती	पूर्ण करण्याचा कालावधी
१.	द्विनोंद लेखा पद्धतीचा अवलंब करणे	अंमलबजावणी करणेत येत आहे.	---
२.	महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे	अंमलबजावणी करणेत येत आहे.	---
३.	मालमत्ता कर विषयक सुधारणा	अंमलबजावणी करणेत येत आहे.	---
४	उचित उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा	अंमलबजावणी करणेत येत आहे.	---
५	गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतुद करणे.	तरतुद करणेत आली आहे.	---

सदर नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेंतर्गत महानगरपालिकेस प्रकल्प किंमतीच्या ७०% शासन अनुदान व ३०% महानगरपालिका हिस्सा असे अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे प्रकल्प राबविणेकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) महानगरपालिका हिस्सा यासाठी आवश्यकतेप्रमाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ.नसीम सलीम शेख

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

पालिका सभा अनुमोदक :- कु. सोनाली विलास सागरे

कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

ठराव क्रमांक :- ४५

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका वॉर्ड क्र.१० मधील वडर कॉलनी येथील समाजमंदिर गेली ४५ ते ५० वर्षापूर्वी बांधणेत आलेले आहे ते अत्यंत जीर्ण व पडीक झालेले असून, त्या इमारतीचे बांधकाम अत्यंत धोकादायक झालेले असलेने, सदर समाजमंदिर वापराविना पडीक झालेले आहे. सदरचे समाज मंदिराची जुने जीर्ण व धोकादायक इमारत पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Nimbalkar मा. वर्षा निंबाळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. उत्तम सारवळकर. महापौर.

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०९/२०२०

ठराव क्रमांक :- ४६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य प्रकाश शामराव मुळके यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वार्ड क्र.१० मधील काळीखण येथे माकडवाले कुंची कोरवी समाज मंदिर असून, सदर समाज मंदिर ५याच वर्षापूर्वी बांधणेत आलेले असून, सद्यस्थितीस ते अत्यंत धोकादायक झालेले आहे. सदर समाज मंदिर जीर्ण झाल्यामुळे त्याची जागो-जागी पडझड होत आहे. त्यामुळे नागरिकांना याचा वापर करता येत नसून ते पडक्या स्थितीत आहे. त्यामुळे सदर धोकादायक समाज मंदिर पाडून त्या ठिकाणी नविन समाज मंदिर उभारणेबाबत समाज बांधवांची मागणी होत आहे. सदरचे धोकादायक समाज मंदिर पाडणेस व त्या ठिकाणी नविन समाज मंदिर उभारणेस प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.४३ दि.१४/०९/२०१९ अन्वये महापालिका प्रभाग क्र.८ मधील स.नं.२४.६१ आर या खुल्या भूखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने स्मारक उभारुन सुसज्ज वाचनालय व उद्यान विकसीत करणेस सविस्तर अहवाल सादर करणेस आदेशित करणेत आले होते.

सदर ठराव पारित होवून त्यामध्ये बराच कालावधी झाला असून, त्यावर प्रशासनाकडून अद्याप अहवाल प्राप्त झाला नसल्याने, उपरोक्त ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने स्मारक उभारुन सुसज्ज वाचनालय व उद्यान विकसीत करणे आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे तरुण पिढीसाठी प्रेरणास्थान असल्याने, सदर ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने स्मारक उभारुन सुसज्ज वाचनालय व उद्यान विकसीत करणेसाठी नकाशा,आराखडा व अंदाजपत्रक तयार करणेसाठी महापालिका पॅनेलवरील वास्तुविशारद मे.एस.पी.तायवडे-पाटील कंन्सलटन्ट प्रा.लि.,सांगली यांची नियुक्ती करणेस व सदरचा प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मनगू केरु सरगर यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली अभयनगर सि.स.नं.५५६४ मधील महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये अल्पसंख्यांक समाजासाठी महिला उद्योग विकास व प्रशिक्षण केंद्र,महिला वसतीगृह, महिला स्वावलंबण प्रशिक्षण केंद्र उभारणे कामी महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभागामार्फत PMJVK अभियांनांतर्गतं निधी उलब्धतेसाठी प्रस्ताव पाठविणेकामी आराखडा तयार करणेसाठी आर्किटेक्ट परिख & असोशिएटस्, सांगली यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.विष्णू माने. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संतोष पाटील. महापौर,

महानगरपालिका सांगली
आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १८/०१/२०२०

ठराव क्रमांक :- ४७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

आण्णा बुवा शॉपिंग कॉम्प्लेक्स मिरज हायस्कूल,मिरज येथील गाळे धारकांना जाग वाढवून देणेबाबत दि.२०/११/२०१९ महासभा ठराव क्र.११९ द्वारे ठराव पारित करण्यात आला होता. परंतु, दि.२०/०१/२०२० रोजीच्या ठराव कायम करणेच्या वेळी सदर ठराव रद्द करण्यात आला परंतु, सदर गाळेधारकांची वारंवार जागा वाढवून देणेबाबत मागणी होत असले कारणाने व सदर गाळेधारक हे गेली कित्येक वर्षापासून सदर मिळकतीमध्ये व्यवसाय करीत असल्याकारणाने त्यांच्या मागणीचा विचार करता व महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीचा विचार करता सदर रद्द केलेल्या ठरावामध्ये दुरुस्ती करुन, दि.२०/११/२०१९ रोजी झालेल्या ठरावाप्रमाणे सदर गाळेधारकांना जागा वाढवून देणेबाबतच्या प्रस्तावावर ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

आण्णाबुवा शॉपिंग कॉम्प्लेक्स मिरज ही जागा मिरज हायस्कूल मिरज या शालेय संस्थेची असून, सदर जागा मा.महाराष्ट्र शासनाकडून तत्कालीन मिरज नगरपालिकेला हस्तांतरीत करणेत आलेली आहे. तसेच सदर जागेमध्ये शाळा व क्रिडांगणाचे आरक्षण असून, कायदेशिररित्या सदर क्रिडांगणामध्ये वाणिज्य वापराच्या इमारतीसाठी जागा वाढवून देता येणार नाही असे या सभेचे मत असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६६ मधील तरतुदींचा विचार करता सदर प्रस्ताव हा कायदाबाह्य असून, दिनांक २०/११/२०१९ चे मा.महासभेपुढे प्रशासनाकडून सादर केलेले आण्णाबुवा शॉपिंग कॉम्प्लेक्स मिरज मधील गाळेधारकांनी जागा वाढवून मिळणेबाबतचे विषयपत्रच मुळात बेकायदेशीर असून, प्रशासनाकडून यापुढे अशा प्रकारचे विषयपत्र व बेकायदेशिर प्रस्ताव महासभेकडे पाठविणेत येवू नयेत असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Asshaikh मा. नसिम शेख ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप आवटी

महापालिका सचिव

महापौर,